# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०३/२०२५ (गुरूवार) संध्याकाळ**

---

## हातभट्टी लावुन दारू गाळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## आरोली पोलीस, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक १९/०३/२०२५ रोजी आरोली पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, महालगाव शेतशिवारात अग्रावाल आणि फत्तु बंधाटे यांचे शेताचे मधोमध पाण्याच्या कॅनला लागुन दोन ईसम हातभट्टी लावुन दारू गाळत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता शेताचे मधोमध दोन इसम हातभट्टी लावुन दारू गाळतांना दिसले. त्यांना त्यांचे नाव पत्ते विचारले असता त्यांनी १) विजय गयानीराम माहुले २) गणेश पुसाराम माहुले, दोन्ही रा. खमारी ता. मोहाडी जि. भंडारा असे सांगितले. दोन्ही आरोपीतांच्या ताब्यातुन १) १० लिटर प्लास्टीक डबकीमध्ये मोहाफुल गावठी हातभटट्ची दारू किमती १,०००/— रूपये, २) ४० लिटर रबरी टयुब मध्ये मोहाफुल हातभटटीची दारू किमती ८,०००/—रूपये,३) ५०० किलो प्लास्टीक पन्नीमध्ये मोहाफुल सडवा किमती १७,५००/— रूपये, ४) दोन लोखंडी ड्रम मध्ये मोहाफुल सडवा ८० किलो किंमती २८००/— रूपये, व इतर साहित्य असा एकुण **किंमती ३२,२५०/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे १) विजय गयानीराम माहुले २) गणेश पुसाराम माहुले, दोन्ही रा. खमारी ता. मोहाडी जि. भंडारा यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन आरोली येथे कलम ६५ बी, सी, ई, एफ ,८३ मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## पोलीस स्टेशन मौदा येथे औदयोगिक आस्थापना पदाधिकाऱ्यांची घेण्यात आली बैठक

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १९/०३/२०२५ रोजी पोलिस ठाणे मौदा तर्फे तहसील कार्यालय येथील मीटिंग हॉल मध्ये पोलिस ठाणे हद्दीतील दिवाणका, श्रीजी ब्लॉक, क्रिस्टल, जतिन ॲग्रो, ओम साई, विशाखा, गोपाल स्नॅक्स, ग्लास गार्ड, सन्मार्क पेपर, श्रीराम फूड, हल्दीराम, जियो, कल्पना अॅग्री , इव्हा कार्टन चारकोल युनीट, अल्ट्राटेक सिमेंट, लिपी पेपर व इतर औद्योगिक आस्थापना चे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीला डॉ. संतोष गायकवाड , उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग, श्री. मोहरकर, जिल्हा औद्योगिक निरीक्षक, श्री सारीन दुर्गे, पोलीस

निरीक्षक ,पोलिस ठाणे मौदा यांनी कंपन्यांतील पदाधिकारी यांना अडीअडचणी, समस्या यांची विचारणा केली तसेच  फायर ब्रिगेड, ॲम्ब्युलन्स बाबत इतर लोकांना व कंपनीला मदत करावी , तसेच बाहेर राज्यातील/ जिल्ह्यातील कामगार बाबत समस्या व कामगारांकडून चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तयार करून घेणे बाबत सूचना देण्यात आल्या.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर